# ३५०० विद्यार्थ्यांनी साकारले पर्यावरणपूरक बाप्पा

## के. के. वाघ संस्थेतर्फे कार्यशाळा; शाडू मातीपासून मूर्ती बनविण्याचे मार्गदर्शन

**प्रतिनिधी | नाशिक**

के. के. वाघ संस्था, स्मार्ट मॅनेजमेंट इंटरफेस लोकल एक्सचेंज (स्माइल) व स्पिनॅच सेंटर ऑफ एक्सलन्स संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १) आयोजित 'इको फ्रेंडली गणेशा' कार्यशाळेत विविध शाळांच्या ३५०० हून विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून मूर्ती साकारली. विद्यार्थी याच बाप्पांची स्थापना करणार आहेत.

विद्यार्थ्यांनी या मूर्तींची स्थापना करावी आणि त्याचे घरीच विसर्जन करावे, असे आवाहन श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टच्या विश्वस्त मनज्योत पाटील यांनी केले. यावेळी विद्या र्थ्यांनी आकर्षक गणेशमूर्तींची निर्मिती केली.



कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक बाप्पा साकारताना.

Divya Marathi 03-09-2024